## प्रकरण **13** वे

### दव्यसहाय्य कार्यक्रमाची अंमलबंजावणी

- बाहयरूग्णांसाठी प्रत्येक तपासणी पेपरला रू.10 आकारण्यात येतात व याची उपलब्धता 15 दिवसापर्यंत असते.
- आंतररूग्ण भरती होण्यासाठी कोणताही आकार घेतला जात नाही आंतर व बाहय रूग्णांना औषधे व इंजेक्याने मोफत दिली जातात. बालकासाठी लसिकरण निशुल्क आहे.
- श्वानदंश लसिकरण निशुल्क आहे.
- रूग्णांना प्रयोग शाळेतील तपासण्या निशुल्क आहेत.
- क्षकिरण व हृदयस्पंदन आलेख तपासण्या या वाजवी दरात म्हणजे रू.30 व 20 रूपयात केल्या जातात.
- रूग्णालयात दाखल होणाऱ्या गरीबांसाठी धर्मादाय निधीची सोय आहे. महागडी अनु अनुसुचित औषधे गरजेप्रमाणे विकत घेवून उपचारासाठी वापरली जातात. प्रयोगशाळेत होणाऱ्या काही वैशिष्टय पूर्ण चाचण्या ज्या हया रूग्णालयात केल्या जात नाहीत, त्याची पूर्तता रूग्णांसाठी या निधीतून पूर्ण केल्या जातात. दारीद रेषेखालील रूग्णांना जर अनअनुसुचित औषधे हवी असतील किंवा वैशिष्टयपूर्ण चाचण्यांसाठी मदत हवी असल्यास एका कागदावर अर्ज करून तपासणी पेपरची सांक्षांकित प्रत जोडून समाज विकास अधिकाऱ्यांतर्फे ही समस्या सोडविली जाते. समाज विकास अधिकारी रूग्णाची व त्यांच्या नातेवाईकाची मुलाखत घेवून स्वतःचा अभिप्राय देतो. रूग्णांचा अर्ज समाज विकास अधिकाऱ्याकडून प्रमुख वैद्यकिय अधिकाऱ्याकडे दिला जातो, त्यांच्या मंजूरीनंतर समाज विकास अधिकारी, औषधमिश्रक यांच्याकडून ती औषधे खरेदी केली जावून रूग्णाला वितरीत केली जातात हा सातत्याने चालणारा उपक्रम आहे.